| | |
|---|---|
| MHKO140007602025 | **नियमित दिवाणी दावा नं.१८३/२०२५**<br>**माया शंकर दळवी**<br>**विरुद्ध**<br>**रघुनाथ रवळू पाटील उर्फ गावडा वगैरे** |

## निशाणी २६ खालील आदेश

**(दिनांक ०२/०३/२०२६)**

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांनी त्यांचेविरुद्ध पारित लेखी जबाब नाहीचा आदेश रद्द होवून लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा हक्कज्ञापन आणि कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांनी कैफियत मुदतीत दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द आदेश पारित झालेला आहे. सदर कामी यातील प्रतिवादी यांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध न झालेने सदर कामी दाव्यास कैफियत व मनाई अर्जास म्हणणे देणे अडचणीचे झाले आहे. सदरचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी यांना कैफियत देवून आपली बाजू मांडता येणार नाही. तसेच सदरकामी प्रतिवादी यांनी जाणून बुजून विलंब केलेला नाही किंवा टाळाटाळ केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला आदेश रद्द करणे न्यायाचे व जरुरीचे आहे. तसे न झाल्यास प्रतिवादी यांचे अपरिमित असे कधीही भरुन येणार नाही, असे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा विलंब माफ होवून प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज.

३. वादीचे सुविद्य विधिज्ञ यांनी अर्जास म्हणणे सादर करुन विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जातील नमुद केलेली कारणे खोटी व चुकीची आहेत.

प्रतिवादी यांच्याकडे महसुल दप्तर विभागातील कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे त्यांनी खोटे नमुद केलेले आहे. विलंबाबत कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. त्यांनी जाणीवपुर्वक विलंब केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत दाखल करता येणार नाही. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. तसेच अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांच्यावर कमीत कमी रु.५०००/- खर्च बसवण्याची विनंती केलेली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचे सुविद्य विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द हक्कज्ञापन आणि कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ हे प्रकरणामध्ये दिनांक १८/१०/२०२५ रोजी हजर झाले आहेत. परंतु त्यांनी मुदतीच्या आत लेखी जबाब सादर केलेला नाही. प्रतिवादी यांनी जवळपास अंदाजे ३ महिन्यापेक्षा जास्तीचा विलंब केलेला आहे. कारण प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांना दाव्या संदर्भात माहिती असुन देखील त्यांनी लेखी जबाब सादर करण्यास विलंब केलेला आहे. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये पुढील सुनावणी झालेली नाही आणि प्रकरण हे तात्पुरत्या मनाई आदेश मिळणेच्या अर्जावर सुनावणी करिता प्रलंबित आहे. तसेच प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांनी अर्जासोबत लेखी जबाब सादर केलेला आहे. तसेच प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता विलंब झाल्याच्या कारणावरुन प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांना लेखी जबाब सादर करण्याची संधी नाकारणे योग्य होणार नाही. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण दाव्यामध्ये वादी यांचा पुरावा सुरु झालेला नाही. प्रकरणात गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी देणे नैसर्गिक न्याय तत्वाच्याआधारे आवश्यक व न्यायोचित आहे. तसेच झालेल्या विलंबाबाबत खर्च बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रु.६००/- बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१, २ व ४ ते ५ यांचेविरुद्ध पारित विना लेखी जबाब आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2026.03.02 17:17:22 +0530

दि.०२/०३/२०२६

**(वामन डी. जाधव)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड**